**प्रेसनोट**

जा.क्र.पोउआ/वाहतुक/नियोजन/१८५८/२०२१ पिंपरी चिंचवड शहर दिनांक-२८/०४/२०२१

सांगवी वाहतूक विभाग हद्दीतील नाशिक फाटा ते वाकड बी.आर.टी.एस. रस्त्यावर साई चौक जगताप डेअरी रहाटणी येथे दोन समांतर विलगक ग्रेड सेपरेटर विकसित करण्याचे काम चालु असतांना सदर कामाचे ठिकाणी शिवार चौकाकडे जाणारा रस्ता हा अचानक झालेल्या पावसामुळे खचला असून रस्त्यास भेगा पडून सदर रस्त्याखालील माती ढासळत असल्याने धोकादायक झालेला आहे. त्यावरुन वाहतूक सुरु राहिल्यास अपघात होण्याची शक्यता असल्याने नमुद ठिकाणचे वाहतूक वळविणे आवश्यक आहे.

ज्या अर्थी पिंपरी चिंचवड शहरातील वाहतूक सुरक्षित व सुरळीतपणे होणेकरीता, महाराष्ट्र शासन गृह विभाग क्र. एम. व्ही. ए. ०१९६/८७१/सी आर-३७/टीआरए-२,दिनांक २७/०९/१९९६चे नोटीफिकेशननुसार मोटार वाहन कायदा ११५,११६(१) (ए) (बी),११६(४) आणि ११७ अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करुन मी सुधीर हिरेमठ (भा.पो.से), पोलीस उप आयुक्त, वाहतुक, पिंपरी चिंचवड शहर यापुर्वी काही निर्बंध असतील ते रद्द करण्यात येत असुन तात्पुरत्या स्वरुपात खालील प्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येत आहे.

**सांगवी वाहतूक विभाग**

१. काळेवाडी फाटा जगताप डेअरी चौक मार्गे शिवार चौकाकडे जाणारी वाहतूकीस डाव्या बाजुने जाण्यास मनाई

**पर्यायी मार्ग** - जगताप डेअरी उड्डाणपुलाखालून उजव्याबाजूकडे वळवून सावित्रीबाई फुले चौक याठिकाणी युटर्न घेऊन नवीन तयार झालेल्या सावित्री बाई फुले चौकाकडून शिवार चौकाकडे जाणा-या ग्रेडसेपरेटरमधून शिवार चौकाकडे वळविण्यात येणार आहे.

वरील प्रमाणे दि.२५/०४/२०२१ पासुन ६० दिवसाकरीता वाहतुक वळविणेत येत आहे.

तरी नागरिकांनी पर्यायी मार्गाचा वापर करावा. बदलाबाबत वॉर्डन व वाहतुक कर्मचारी यांना सहकार्य करावे असे आवाहन पिंपरी चिंचवड शहर ,वाहतुक शाखा यांचे मार्फतीने करण्यात येत आहे.

Hiremath

सुधीर हिरेमठ (भा.पो.से.)
पोलीस उप-आयुक्त,
वाहतूक शाखा,पिंपरी चिंचवड

प्रति,

जिल्हा माहिती व प्रसिध्दी अधिकारी,
नविन मध्यवर्ती इमारत, पुणे – ०१

प्रत:-

१)पोलीस निरीक्षक, प्रेसरुम, पोलीस आयुक्त कार्यालय, पिंपरी चिंचवड शहर.

२/- सदर प्रेसनोटच्या प्रती पत्रकारांना देवून, सदरची बातमी वर्तमानापत्रातून प्रसिध्द करण्याची विंनती करावी.

२)सहा. पोलीस आयुक्त, वाहतूक शाखा, पिंपरी चिंचवड शहर.

३) पोलीस निरीक्षक सांगवी वाहतूक विभाग पिंपरी चिंचवड शहर.

४) कार्यकारी अभियंता, बी.आर.टी.एस. विभाग, पिंपरी चिंचवड मनपा.

२/- सदर ठिकाणी वरील वाहतूक वळविणारे फलक बसविणेची कार्यवाही होणेस विनंती आहे.